जनकल्याण प्रतिष्ठान संचलित,

## सरस्वती शिशुवाटिका, कराड

## तालुका - कराड

## जिल्हा - सातारा

# नवोपक्रम

# “बालकौशल्य विकास”

## जुई मोठा गट

शिक्षिका नाव


## सौ. अनुजा श्रीधर ग्रामोपाध्ये.

सरस्वती शिशुवाटिका, कराड.

# अनुक्रमणिका


| अ. क्र | नवोपक्रम लेखन मुद्दे | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | नवोपक्रम शीर्षक | १ |
| २ | शिक्षक माहिती | ३ |
| ३ | बालकौशल्य विकास माहिती | ४ |
| ४ | नवोपक्रम गरज व महत्व | ८ |
| ५ | नवोपक्रमाची उद्‌दिष्टे | १० |
| ६ | नवोपक्रम नियोजन | १२ |
| ७ | नवोपक्रम फोटो | १७ |
| ८ | नवोपक्रम कार्यपद्‌धती | २० |
| ९ | नवोपक्रम यशस्विता व फलनिष्पत्ती | २५ |
| १० | समारोप | २७ |
| ११ | संदर्भसूची व परिशिष्टे | २८ |

# शिक्षक माहिती

**नवोपक्रम विषय - सर्वांगीण विकास**

**नवोपक्रम शीर्षक - बालकौशल्य विकास**

स्पर्धा गट - पूर्व प्राथमिक गट

जुई मोठा गट

**शाळेचे नाव - जनकल्याण प्रतिष्ठान संचलित,**

**सरस्वती शिशुवाटिका कराड**

( मंगळवार पेठ, कराड )




स्पर्धकाचे नाव - सौ. अनुजा श्रीधर ग्रामोपाध्ये.

पत्ता - 278 भैरोबा गल्ली, सोमवार पेठ, कराड.

तालुका - कराड , जिल्हा - सातारा

मोबाइल नंबर - ९४०३१६६९०८ , ७७१९०३१४३०

जन्म तारीख - १५ / ०३ / १९७३

Email - anujasgramopadhye@gmail.com


शैक्षणिक पात्रता - १२ वी, बालवाडी प्रशिक्षण

सेवा कालावधी - १९ वर्षे

स्पर्धा गट - पूर्व प्राथमिक गट

# बालकौशल्य विकास उपक्रम माहिती

कोरोनाच्या संकटामुळे आम्ही ऑनलाइन शाळा सुरू केली. जुई मोठ्या वर्गाचे ऑनलाइन शाळेत शालेय अभ्यासक्रमाबरोबर इतरही कौशल्य विकसित करणारे क्रियाकलाप तसेच उपक्रम घेण्याचे ठरविले. त्यासाठी ऑनलाइन शाळेचे पूर्ण वर्षाचे नियोजन ठरविले. जुई मोठ्या वर्गात ३९ मुले होती त्यांच्या पालकांचा ग्रुप तयार केला. शालेय अभ्यासाबरोबर कृतियुक्त व कौशल्य वाढवणाऱ्या उपक्रमांची यादी ठरवली व त्याची सविस्तर माहिती पालकांना दिली. आणि ऑनलाइन शाळेत उपक्रम सुरू केले. ते उपक्रम व त्यातून झालेला मुलांचा कौशल्यविकास याबद्दलची सविस्तर माहिती खालीलप्रमाणे-

| अ. क्र | उपक्रमाचे नाव | दिनांक | उपस्थित विद्यार्थ्यांची संख्या | कौशल्य विकास |
|---|---|---|---|---|
| १ | जलचक्र माहिती | ०४-०८-२०२० | ३४ | भाषा विकास, सृष्टी परिचय, जिज्ञासा उत्पन्न, चित्रे काढण्याचा अनुभव. |
| २ | इंद्रधनुष्य माहिती | | ३४ | रंग ज्ञान, मोजणे क्रिया, एकाग्रता, चित्रे काढण्याचा सराव, भाषा विकास. |
| ३ | प्रार्थना, भजन, श्लोक | ते | ३० | बोलण्याचे कौशल्य, वाचा शुद्धी, पाठांतरची सवय, चांगला संस्कार, |
| ४ | कृष्णजन्माष्टमी | | ३३ | भाषा विकास, देवदेवतांची माहिती, शब्द संपतीत वाढ. |
| ५ | देवपूजा | १४-०८-२०२० | ३५ | भाषा विकास, विविध देवतांची माहिती, एकाग्रता, स्वतः केल्याचा आनंद, संस्कार. |
| | | | एकूण = १६६ | |
| ६ | तिरंगी झेंड्याची माहिती | १५-०८-२०२० | ३३ | राष्ट्रीय प्रतीकांची माहिती, रंगांची माहिती, चित्र काढणे व रंगवणे सराव. |
| ७ | दुर्वा निवडणे | | ३७ | दूर्वा निवडणे कौशल्य प्राप्त, निरीक्षण शक्ती वाढ, नवनिर्मिचा आनंद. |
| ८ | रांगोळी काढणे | ते | ३६ | स्नायूंचा विकास, एकाग्रता वाढ, बोटांचे क्रिया कौशल्य, अंक सराव, कल्पकता. |
| ९ | शरीराचे अवयव माहिती | | ३६ | भाषा विकास, कर्मेंद्रिये व ज्ञानेंद्रिये माहिती, शब्द संपत्तीत वाढ, अवयवांची माहिती. |
| १० | फळांचा परिचय | ०२-०९-२०२० | ३६ | भाषा विकास, फळांची नावे, रंग, चव, आकार, एक बी, अनेक बी, फळे परिचय. |
| | | | एकूण = १७८ | |
| ११ | भाज्या परिचय | ०४-०९-२०२० | ३४ | भाषा विकास, भाज्यांचे रंग, वास परिचय, आहारातील भाज्यांचे महत्त्व. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १२ | सजीव निर्जीव | | ३४ | सृष्टी परिचय, विज्ञानुभवतून शब्दांचा परिचय, बुद्धी विकास, कुतूहल निर्माण. |
| १३ | वाद्यांचा परिचय | ते | ३४ | श्रवणेंद्रिये विकास, वस्तूंची नावे परिचय, आवाज कमी जास्त संकल्पना. |
| १४ | चित्रावर काचा, बिया, फोलकटे चिकटवणे | | ३४ | बोटांच्या स्नायूंचा विकास, नवनिर्मितीचा आनंद, कल्पकतेचा विकास, अवलोकन शक्ती वाढ. |
| १५ | भौमितिक आकारांचे डिझाईन तयार करणे | १६-०९-२०२० | ३४ | हाताच्या स्नायूंचा विकास, सौंदर्य दृष्टी वाढ, गणिताची ओळख, विविध आकाराची माहिती. |
| | | | एकूण = १७० | |
| १६ | डाळींचा परिचय | २१-०९-२०२० | ३६ | भाषा विकास, शब्द संपत्तीत वाढ, विविध डाळींचा सूक्ष्म फरक ओळख, रंग परिचय. |
| १७ | लिंग परिचय | | ३५ | भाषा विकास, वस्तु परिचय, खेळाद्वारे व्याकरण ओळख, बोलण्याचे कौशल्य’ |
| १८ | कोलाज काम | ते | ३५ | बोटांचे कौशल्य वाढ, कल्पकता विकास, हातांच्या स्नायूवर ताबा मिळवणे. |
| १९ | पक्षी परिचय | | ३५ | सृष्टी परिचय, भाषा विकास, विविध पक्ष्यांची नावे, आवाज, अन्न परिचय. |
| २० | हवेचे अस्तित्व | ०५-१०-२०२० | ३६ | विज्ञान अनुभव, हवेचा अनुभव, शोध करण्याच्या वृत्तीत वाढ, ज्ञानात भर. |
| | | | एकूण = १७७ | |
| २१ | सेल वर चालणारी उपकरणे | ०७-१०-२०२० | ३५ | भाषा विकास, विविध वस्तूंचा परिचय, कुतूहल वाढ, अवलोकन होणे. |
| २२ | फुलांचा परिचय | | ३५ | सृष्टी परिचय, भाषा विकास, शब्द संपत्तीत भर, विविध फुलांची नावे, वास, आकार परिचय होणे. |
| २३ | पाळीव प्राणी | ते | ३७ | सृष्टी परिचय, भाषा विकास, विवध प्राण्यांची नावे, आवाज, निवारा, उपयोग, प्रेमभावना जागृत होणे. |
| २४ | जंगली प्राणी | | ३६ | भाषा विकास, विविध जंगली प्राण्यांची नावे, निवारा, अन्न माहिती. |
| २५ | चांगल्या सवई - कपड्यांच्या घड्या घालणे, मोजे घालणे, वस्तु नीटनेटक्या ठेवणे. | १६-१०-२०२० | ३७ | स्वावलंबनाची सवय, स्नायूंचा विकास, चांगल्या सवई, जीवनाच्या विशेष गरजा भागवणे, काम करण्याची हातोटी निर्माण होणे, स्वतः केल्याचा आनंद मिळणे. |
| | | | एकूण = १८० | |
| २६ | हार, तोरण, माळ करणे | १९-१०-२०२० | ३८ | हार, तोरण, माळ करण्याच्या क्रियेत कौशल्य प्राप्त, स्नायूंचा विकास, क्रिया करण्याचा आनंद, काम करण्याची हातोटी प्राप्त होते. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २७ | रांगोळीत रंग भरणे | | ३८ | एकाग्रता वाढ, नवनिर्मिती, रंगसंगतीचे ज्ञान प्राप्त, बोटांचा विकास. |
| २८ | घोटीव कागद घर | ते | ३५ | घडी घालण्याचे कौशल्य वाढ, एकाग्रता वाढ, व्यवस्थितपणचा गुण विकसित. |
| २९ | पेपर डिशवर डिझाईन | | ३२ | कल्पना शक्ती विकास, नवनिर्मिती आनंद, बोटांच्या स्नायूंचा विकास. |
| ३० | मातीकाम | ११-१२-२०२० | ३६ | जीवनाशी घनिष्ट संबंध, हातांना व्यायाम, शिल्पकलेची सुरवात, कलागुणांचा विकास, मातीमध्ये खेळण्याचा आनंद, सौंदर्य दृष्टी विकास. |
| | | | एकूण = १७९ | |
| ३१ | बाटलीत पाणी भरणे | १६-१२-२०२० | ३५ | एकाग्रता वाढ, पाणी भरण्याचे कौशल्य प्राप्त, स्वावलंबनाची सवय. |
| ३२ | बॉल ने बाटली पाडणे | | ३३ | हातांना व पायांना व्यायाम, बौद्धिक चालना, एकाग्रता, मानसिक आनंद. |
| ३३ | कार्डशीटवर दोरे काम | ते | ३३ | हातांच्या स्नायूंवर ताबा मिळवणे, कल्पनाशक्ती विकास, बौद्धिक विकास. |
| ३४ | ऑनलाइन स्नेहसंमेलन | | ३३ | मुलांच्या कलावृत्तीचा विकास, सौंदर्य निर्मिती, धीटपणा, बोलण्याचे कौशल्य वाढ, नृत्याचा आनंद, अभिनय कौशल्य. |
| ३५ | नोटा नाणी परिचय | २१-०१-२०२१ | ३१ | नोटा नाणी परिचय, अंक परिचय, गणिताविषयी प्राथमिक कल्पना. |
| | | | एकूण = १६५ | |
| ३६ | भेटकार्ड तयार करणे | २२-०१-२०२१ | ३० | हातांच्या स्नायूचा विकास, नीटनेटकेपणा वाढ, भावना संवेदना जाणीव. |
| ३७ | विदूषक टोपी | | ३० | बोटांची कुशलता वाढ, भाषा विकास, एकाग्रता वाढ, नवनिर्मितीचा आनंद. |
| ३८ | सम विषम संख्या | ते | २७ | अंकांची कल्पना, गणिताचा परिचय, खेळातून सम विषम संख्या सांगणे. |
| ३९ | घोटीव कागद फोटो फ्रेम | | ३१ | घडी घालण्याचे कौशल्य प्राप्त, भाषा विकास, कल्पना शक्ती वाव. |
| ४० | दागिने परिचय | ०५-०२-२०२१ | ३० | भाषा विकास, शब्दसंपत्तीत भर, विविध दागिन्यांची नावे परिचय, |
| | | | एकूण = १४८ | |
| ४१ | आवडत्या वस्तूंचा संग्रह दाखवणे | ११-०२-२०२१ | २८ | ज्ञानमय विश्व निर्माण होणे, भाषा विकास, धीटपणा वाढ, विविध वस्तूंचा परिचय, स्वतःच्या वस्तु दाखविण्याचा आनंद. |
| ४२ | पताका तयार करणे | | ३० | नवनिर्मितीचा आनंद, भाषा विकास, कल्पनाशक्ती वाव, कापण्याचे कौशल्य वाढ. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४३ | शिवजयंती | ते | ३० | पाठांतर कौशल्य वाढ, पूर्वजांची ओळख, पराक्रमाचा संस्कार, |
| ४४ | घोटीव कागदाचा मासा | | ३२ | घडी घालण्याचे कौशल्य प्राप्त, नवनिर्मितीचा आनंद, भाषा विकास. |
| ४५ | अंक चिठ्ठी टोपलीचा खेळ | २५-०२-२०२१ | ३२ | गणिताचा परिचय, चिठ्ठीतील अंक ओळखणे, अंकाएवढ्या वस्तु मोजणे. |
| | | | एकूण = १५२ | |
| ४६ | काकडी, गाजर, बीट खिसणे | ०३-०३-२०२१ | ३२ | खिसण्याच्या क्रियेत कौशल्य वाढ नवनिर्मितीचा आनंद, स्नायूचा विकास, आहारातील भाज्यांचे महत्व. |
| ४७ | मिश्र रंग दाखवणे | | ३० | रंगाची ओळख, डोळ्यांचा विकास, बोटांचे कौशल्य विकास, स्वतः रंगावल्याचा आनंद. |
| ४८ | चंद्र चांदण्यांची माहिती सांगणे | ते | ३३ | आकाशाची माहिती, सृष्टीची माहिती, बौद्धिक विकास, कुतूहल वाढ. |
| ४९ | सरबत करणे | | ३० | स्वतः प्रयोग केल्याचा आनंद, कोणत्या वस्तु विरघळतात हे समजणे, बोटांचे कौशल्य वाढ, सरबत केल्याचा आनंद. |
| ५० | कमी जास्त वस्तूंची संकल्पना सांगणे | १९-०३-२०२१ | ३१ | कमी जास्त वस्तूंचा परिचय, गणिताची ओळख, बौद्धिक विकास. |
| | | | एकूण = १५६ | |
| ५१ | विविध चित्रे पाटीवर व वहीवर काढणे | २५-०३-२०२१ | ३३ | बोटांचे कौशल्य वाढ, नवनिर्मितीचा आनंद एकाग्रता वाढ, भावनिक विकास. |

# नवोपक्रमाची गरज व महत्व

## • उपक्रमाचे कारण :-

लहान मुलं अनुकरणशील असतात. कारण त्यांची निरीक्षण क्षमता चांगली असते. यासाठी लहान वयातच बालकांच्या मनाचा विकास चांगल्या प्रकारे व्हावयास हवा. २ ते ६ ही वय अत्यंत संवेदनाक्षम व संस्कारक्षम असते. या लहान वयातच मनाची जडण-घडण होत असते. त्यासाठी बालकाला ज्या शिक्षणाचा उपयोग जीवनात होईल असे शिक्षण देणे गरजेचे आहे. प्रत्यक्ष जीवन जगणे व त्यातून विकास साधने ही जीवन शिक्षणाचे महत्व आहे. बालकांना कृतियुक्त व कौशल्ययुक्त शिक्षण त्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देणारे असते.

आपल्या जीवनामध्ये शालेय अभ्यासक्रमाला खूप महत्व आहे पण त्याच बरोबर बालकांचा शारीरिक, मानसिक, भावनिक, बौद्धिक विकास होणे गरजेचे आहे. बालके जेव्हा स्वतः कृती करतात तेव्हा, अधिक ज्ञान ग्रहण करतात आणि दीर्घकाळ ते ज्ञान त्यांच्या स्मरणात राहते. शालेय अभ्यासक्रमाबरोबरच बालकांना उत्साह वाटेल असे कृतियुक्त व कौशल्यपूर्ण शिक्षण द्यावे असे वाटले. कोरोनामुळे सर्व बालके घरातच आहेत त्यांचा सर्वांगीण विकास थांबता कामा नये म्हणून बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी मनोरंजनात्मक कृतियुक्त व कौशल्ययुक्त शिक्षण द्यावे असे वाटले.

## • नवोपक्रमाचे वेगळेपण :-

१. सन २०२०-२१ या वर्षी कोरोनाचे संकट आले आणि सारे बदलून गेले. सगळीकडे सर्व बंद होते पण आमची सरस्वती शिशुवाटिका ऑनलाइन चालू होती.
२. ऑनलाइन शाळा माझ्यासाठी नवीन व वेगळी होती. मुलांबरोबर पालकही ऑनलाइन शाळेला हजर असणार आहेत त्यामुळे शाळेचा अभ्यास पालकांना समोरासमोर समजणार आहे.
३. त्यामुळे अभ्यासाबरोबर बालकांचे कौशल्य वाढेल असेच उपक्रम शोधले की जे घरच्या घरी घरातील साधने वापरुन करता येतील.
४. माझ्या जुई मोठ्या वर्गाची ऑनलाइन शाळा दिनांक ३०-०७-२०२० ला सुरू झाली. माझ्या वर्गात ३९ विद्यार्थी होते. आठवड्यातून ३ दिवस १ तास ऑनलाइन शाळा सुरू होती
५. मी १ तास शिकवले तरी मुले दिवसभर शाळेत शिकवलेल्या उपक्रमात गुंतून राहत होती.
६. सुरवातीला मुलांना ऑनलाइन शाळा नवीन होती पण हळूहळू ऑनलाइन शाळा मुलांना खूप आवडायला लागली. व सर्व विद्यार्थी व्यवस्थित आवरून नियमित शाळेला हजर राहू लागली. आणि सर्वजण रोज शाळा घेण्याची मागणी करू लागले.

७. माझ्या वर्गाचे कामकाज शाळेतील अभ्यासक्रमाबरोबरच वेगवेगळ्या उपक्रमात आघाडीवर होते, त्यामुळे त्याचा मुलांना खूप फायदा झाला. मला, मुलांना व पालकांना शाळा बंद आहे असे वाटलेच नाही. त्यामुळे शाळेची संपूर्ण फी भरण्यामध्ये माझ्या वर्गाचा पहिला नंबर होता.
८. मुलांचा सर्वांगीण विकास व त्यांची कौशल्य वाढवण्यात माझ्या नवोपक्रमाची मदत झाली असे वाटते.
९. मी शालेय अभ्यासक्रमाबरोबर कृतियुक्त व कौशल्यपूर्ण ५१ उपक्रम घेतले व ते छान यशस्वी पार पडले. त्यामुळे मुलांना विविध उपक्रमाची माहिती मिळाली.
१०. माझ्या '**बालकौशल्य विकास**' या उपक्रमाने मुलांचा भावनिक शारीरिक, मानसिक, बौद्धिक विकास मी करू शकले. अश्या प्रकारे १५ एप्रिल पर्यंत पूर्ण वर्षभर ऑनलाइन शाळा छान प्रकारे यशस्वी झाली.

## • नवोपक्रमाची उपयुक्तता :-

१. मी घेत असलेल्या कृतियुक्त व कौशल्ययुक्त उपक्रमामुळे मुलांना शाळेची आवड निर्माण झाली.
२. कौशल्ययुक्त उपक्रमामुळे मुले व्यस्त राहू लागली.
३. दररोज ऑनलाइन शाळेत बाई आज काय शिकवणार याची मुलांना उत्सुकता वाटू लागली.
४. मुलांची एकाग्रता व निरीक्षण शक्ती वाढली.
५. घेतलेल्या उपक्रमावर निरक्षण मांडता येऊ लागले.
६. विविध साधने हाताळता येऊ लागली.
७. नवीन साधनांची माहिती झाली व त्या साधनांचा वापर कसा करायचा हे समजले.
८. मुले धीट व बोलकी झाली व आपले मुद्दे मांडू लागली.
९. मुले सर्व उपक्रमात सहभाग घेऊ लागली.
१०. मुलांना घरातील उपलब्ध असलेल्या साहित्यातूनच उपक्रम करण्याची दिशा मिळाली.

# नवोपक्रमाची उद्दिष्टे

## • हा नवोपक्रम मी का करते आहे :-

१. बालकांचे २ ते ६ हे वय खूप संस्कारक्षम असते. त्यामुळे बालकांना छोट्या छोट्या कृतीतून त्यांच्यावर स्वावलंबन, स्वच्छता, कामाची सवय लावणे त्यांच्यातील कौशल्यांचा विकास करणे ही नवोपक्रमाचे मुख्य उद्दिष्ट आहे.

२. कोरोनाचे संकट हे माझ्यासाठी व बालकांसाठी संधी म्हणून बघणे व बालकांचा सर्वांगीण विकास करणे.

३. बालकौशल्य विकास करत असताना बालकांच्या नवनिर्मिती व कल्पकतेचा विकास करणे.

४. लहानपणीच मुलांना स्वच्छता, चांगल्या सवयी, स्वावलंबन शिकवले तर त्यांना मोठेपणी छान सवयी लागतात हे निदर्शनास आणून देणे.

५. बालकांनी कोणतीही कृतियुक्त गोष्ट केली तर त्यांना त्याचा खूप आनंद होतो आणि त्यांचा सर्वांगीण विकास होण्यास मदत होते हे पालकांना सांगणे.

६. बालकांचा आत्मविश्वास वाढवणे, बालकांना बोलते करणे, त्यांना त्यांच्या शारीरिक अवयवांचा विकास करून दैनंदिन जीवन व्यवहारातील छोट्या छोट्या गोष्टी शिकवणे.

## • नवोपक्रमाचा फायदा कुणाला :-

१. 'बालकौशल्य विकास' हा नवोपक्रम माझ्याकडे अध्यापनासाठी असणाऱ्या जुई वर्गावर केला. त्याचा खूप मोठा फायदा जुई वर्गाला झाला.

२. या नवोपक्रमामुळे जुई वर्गातील मुलांनी विविध कौशल्ये प्राप्त केली. व त्याचा उपयोग त्यांनी आपल्या दैनंदिन व्यवहारात सुरू केला.

३. या नवोपक्रमामुळे मुलांनी उपक्रमाचे केलेले फोटो ग्रुपवर पाठवत असल्यामुळे इतरही मुलांना प्रेरणा मिळत गेली आणि पूर्ण वर्गाला त्याचा फायदा झाला.

४. कोरोनाच्या संकटामुळे सर्वकाही बंद होते पण आमची शाळा मात्र ऑनलाइन पद्धतीने छान सुरू होती. मुलांच्यातील बदल पालक जवळून पाहत होते. पालक मुलांनी केलेल्या उपक्रमाचे फोटो त्यांच्या whatsapp स्टेटस वर टाकत होते त्यामुळे नातेवाईक, मित्र-मैत्रिणींपर्यंत आमचे उपक्रम पोहचत होते व त्यामुळे मुलांचे कौतुक होत होते.

५. प्रत्येक घरात शाळेचे नाव झाले व शाळेचा नावलौकिक वाढला.

६. जुई वर्गातील मुले घरातील छोटी छोटी कामे करायला लागली त्यामुळे घरात मुलांची मदत झाली.

७. कोरोना काळात ऑनलाइन शिकवणे हा नवीन अनुभव मिळाला. ऑनलाइन शिकवताना खूप नवीन गोष्टी मला शिकायला मिळाल्या.

८. नवीन शैक्षणिक धोरण २०२० हे कृतियुक्त व कौशल्य विकास या शिक्षणावर आधारित आहे. त्यामुळे माझ्या नवोपक्रमाचा उपयोग त्या धोरणसाठी नक्कीच होईल.

## • नवोपक्रमाची उद्दिष्टे :-

### ❖ नवोपक्रमातील कोणत्या कृतीमुळे व काय साध्य झाले

१. बालवाडी शिक्षिकेसारखा आनंद तो कोणता? बाल विश्वात रमण्यासारखं दुसरं सुखं नाही पण बाल विश्वात रमत असताना बालकांना मनोरंजनात्मक, हसत खेळत संस्कार देता येतात तेच खरे परिपूर्ण शिक्षण होय.

२. 'बालकौशल्य विकास' या नवोपक्रमामुळे वर्ग, शाळा, समाज यांची प्रगती करण्यासाठी कौशल्यपूर्ण असणाऱ्या पिढीसाठी हा नवोपक्रम उपयोगी पडेल.

३. क्रियाकौशल्य शिकवत असताना स्वावलंबन, चांगल्या सवयी, स्वच्छता, कामाची सवय इत्यादी गोष्टी शिकवल्यामुळे मुले दैनंदिन व्यवहारातील छोट्या छोट्या गोष्टी करू लागले. त्याचा उपयोग घरात झाला.

४. जुई वर्गातील सर्व मुलांचा सहभाग सर्व अभ्यास व उपक्रमात होता त्यामुळे माझाही उत्साह वाढला. मुलांना अभ्यासबरोबर इतरही खूप नवीन गोष्टी शिकवल्या.

५. नवोपक्रमामुळे ऑनलाइन शाळेत मुले खूप धीट झाली बोलण्याचे कौशल्य वाढले, पाठांतर वाढले, त्यामुळे मुलांनी विविध ऑनलाइन स्पर्धेत सहभाग घेतला आणि यश संपादन केले.

६. बालकौशल्य विकास हा नवोपक्रम बालकांचा सर्वांगीण विकास हे ध्येय डोळ्यासमोर ठेवून केल्यामुळे वर्गाचा, शाळेचा चौफेर विकास व प्रगती झाली.

७. या प्रमाणे या नवोपक्रमात बालकांचा सर्वांगीण विकासाचे ध्येय ठेवून माझी भूमिका पार पाडत होते.

# नवोपक्रमाचे नियोजन

## • उपक्रमपूर्व स्थितीचे निरीक्षण :-

१. पालक मुलांच्या संपर्कात जास्त वेळ नसल्यामुळे मुलांशी संवाद कमी वाटत होता.त्यामुळे मुळे अबोल वाटत होती.
२. मुलांनी एखाद काम केल तर त्याला प्रोत्साहन दिलं जात नसावं.
३. पालकांना अभ्यासाव्यतिरिक्त ( लिहणे, वाचने ) इतर कोणत्याही गोष्टी महत्वाच्या वाटत नव्हत्या.
४. घरातील विविध वस्तूंची नावे मुलांना माहिती नव्हती. घरातील छोटी छोटी कामे करणे मुलांना कमीपणाचे वाटत होते.
५. पालकांना शाळेतील अभ्यास तसेच उपक्रम यांची माहिती काही वेळा व्यवस्थित पोहचत नव्हती. पालकांच्यात एकी नव्हती. पालक स्वतःच्या मुलांनपुरताच विचार करत होते. इतर मुलांच कौतूक करत नव्हते.
६. मुलांचा शारीरिक, भावनिक, मानसिक विकास कमी प्रमाणात दिसला.
७. मुलांना खूप गोष्टी बोलायच्या असतात, त्यांच्या विविध वस्तु दाखवायच्या असतात पण त्यांच्याशी बोलायला वेळ कमी असतो, त्यांच्या वस्तु फारश्या महत्वाच्या वाटत नाहीत.

## • संबंधित व्यक्ति, तज्ञ यांच्याशी चर्चा :-

आजच्या धकाधकीच्या काळात पालकांना आपल्या मुलांसोबत द्यायला वेळ कमी आहे मुलांना भरपूर बोलायचे आहे, त्यांना सर्व गोष्टी स्वतः करून बघायच्या आहेत पण पालक त्यांना करू देत नाहीत. पालकांना मुलांनी घरातील कामे करणे हे महत्वाचे वाटत नाही. या सर्व गोष्टीतून मला हा उपक्रम करावा वाटला. कोरोनामुळे सर्वजण घरात असल्यामुळे पालक आपल्या पाल्याकडे व्यवस्थित लक्ष देतील आणि माझ्या उपक्रमाचा मुलांना फायदा होईल असे मला वाटले म्हणून पालकांशी बोलून मी हा उपक्रम केला.

बालकांच्या सर्वांगीण विकास व त्यांच्यातील कौशल्यविकासासाठी असा मी उपक्रम करणार आहे त्यासाठी शिशुवाटिकेच्या मुख्याध्यापिका सौ. माटे बाई यांच्याशी चर्चा केली व त्यांची परवानगी घेतली. आदर्श शिक्षक पुरस्कार, नेशन बिल्डर पुरस्कार तसेच राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धा २०२०-२१ प्राथमिक शिक्षक मुख्याध्यापक गट द्वितीय क्रमांकाने सन्मानित शाळेचे पर्यवेक्षक व माझ्या वर्गाचे पालक श्री. विजय कुलकर्णी सर यांचे उत्तम मार्गदर्शन मिळाले. शाळेच्या शालेय समितीसमोर हा उपक्रम मंजूर झाला अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, शालेय समिती सदस्य यांच्या समोर नवोपक्रम कथन केला आणि परवानगी घेतली.

## • आवश्यक साधनांचा विचार :-

१. संस्थेने ऑनलाइन तंत्रस्नेही प्रशिक्षण दिले. बालकौशल्य विकसित करण्यासाठी पालकांचा सहभाग मोठा होता त्यासाठी त्यांच्याशी चर्चा करणे गरजेचे होते.

२. पालकांना ऑनलाइन शाळा व उपक्रम घेण्यासाठी व समजून सांगण्यासाठी गूगल मीट (google meet) हे प्रभावी माध्यम समजून सांगणे गरजेचे होते.

३. विविध उपक्रम निश्चित केले. घरातील वस्तूंचा उपक्रमासाठी वापर केला.

४. कोरोनामुळे सर्व बंद असल्यामुळे मुलांना किती वेळ आणि कसे गुंतवून ठेवणे हे ठरवले.

५. बालकांना हसत-खेळत, मनोरंजनात्मक, कृतियुक्त व कौशल्ययुक्त संस्कारक्षम शिक्षण कसे देता येईल याचा विचार केला.

## • करावयाच्या कृतींचा क्रम :-

१. शालेय वार्षिक अभ्यासक्रम व उपक्रम नियोजन ठरवले. त्यामध्ये कोरोनामुळे सर्व बंद असल्यामुळे घरातील वस्तुच वापरुन घरच्या घरी घेता येणाऱ्या उपक्रमांची यादी बनवली.

२. वर्षाच्या सुरवातीपासूनच शाळेची ऑनलाइन पालकसभा घेऊन पालकांना या सर्व उपक्रमांची कल्पना दिली. शालेय अभ्यास व उपक्रम मुख्याध्यापक व पालक यांच्याशी चर्चा करून ठरविले.

३. बालकांना जर हे कृतियुक्त विविध उपक्रम करून घेतले तर बालकांचा कोणता विकास होतो व कोणते कौशल्य वाढते याची पालकांना कल्पना दिली.

४. जुई मोठ्या वर्गाचा whatsapp group करून त्यावर विविध माहिती पाठवून पालकांना माहिती दिली.

५. सुरवातीला पालकांना थोड्या अडचणी आल्या काही गोष्टी समजायला थोडा वेळ लागला पण वेळोवेळी सूचना देऊन त्यांच्या अडचणी दूर केल्या.

६. कोणताही उपक्रम घेण्याअगोदर पालकांना एक आठवडा सूचना देत असे.

७. ऑनलाइन शिकवताना काही पालक गैरहजर असतील तर त्यासाठी व्हिडीओ पाठवले जात असे.

८. मुलांना शिकवलेले पाठांतर ऑनलाइन शाळेतच मुलांकडून म्हणवून घेत असे. मुलांनी केलेला अभ्यास, पाठांतर, उपक्रम यांचे मेसेज करून कौतूक करत होते त्यामुळे मुलांना प्रोत्साहन मिळत होते.

९. वर्गातील उपक्रम, पाठांतर स्पर्धा, रंगभरण स्पर्धा, भाषण स्पर्धा हे व्हिडीओ द्वारे मुख्याध्यापिकांसमोर लावून दाखवत असे मुलांच्या सरावामुळे, कौतुकामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढला. मुले धीट होऊ लागली.

१०. मुलांच्यातील अबोलपणा भीती जाऊन मुले विविध कार्यक्रमात, पाठांतर स्पर्धेत उत्तम यश मिळवू लागली.

## • उपक्रमोत्तर स्थितीचे निरीक्षण :-

१. रोजच्या दैनंदिन व्यवहारामध्ये मुले स्वतःची कामे स्वतः करू लागली, मुले घरातील छोटी छोटी कामे करू लागली उदा. केर काढणे, कपड्यांच्या घड्या घालणे, शर्ट हँगरला लावणे, भाजी निवडणे, दूर्वा निवडणे, हार करणे, रंगोळी काढणे, सरबत करणे, काकडी खिसणे, बाटलीत पणी भरणे, मोजे घालणे, मातीच्या वस्तु बनवणे व रंगवणे, स्वतःच्या वस्तु नीटनेटक्या व व्यवस्थित ठेवणे, चित्रे काढणे, पाठांतर करणे, छोटी छोटी भांडी घासणे, भेटकार्ड तयार करणे इ.

२. ऑनलाइन पाठ शिकवताना त्यांना एखादी गोष्ट नाही कळाली तर स्वतः प्रश्न विचारू लागली मुले बोलती झाली पाठानुसार विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देऊ लागली स्वतःचे मत मांडू लागली ऑनलाइन शाळेत मुले प्रार्थना, भजन, श्लोक, गाणी, गोष्ट म्हणतात हे बघून इतरही मुले पाठांतर करून म्हणू लागली.

३. अगोदर जी मुले फारशी बोलत नव्हती, बोबडे, चोचरे बोलत होती त्यांच्यातही छान प्रगती झाली.

४. एखादी गोष्ट नाही मिळाली तर त्या गोष्टीला मुलांना पर्याय शोधायला शिकवल्यामुळे मुले आनंदाने घरातील वस्तूंचा पर्यायी वापर करू लागली उदा. लग्नपत्रिकेपासून भेटकार्ड तयार करणे, घरातील वस्तू वापरुन अंक मोजणे, घरातील वस्तु वापरुन खेळ खेळणे इ.

५. मुलांनी लो. टिळक भाषण स्पर्धा, अथर्वशीर्ष पाठांतर स्पर्धा, रंगोळीत रंग भरण स्पर्धा, मनाचे श्लोक पाठांतर स्पर्धा, स्नेहसंमेलन, शिवजयंती, दासनवमी, आवडत्या वस्तूंचा संग्रह दाखवणे इ. सर्व उपक्रमात मुलांचा ९०% सहभाग राहीला. वरील विविध स्पर्धेमध्ये मुलांनी उत्तम यश संपादन केले.

६. जुई वर्गाचा इतका नावलौकिक वाढला की ऑनलाइन शाळा असून, कोरोनाचे संकट असून पूर्ण वर्षाची फी भरणार पूर्ण वर्ग म्हणून आणि सर्व उपक्रमामध्ये उत्तमरित्या सादरीकरण करणार वर्ग म्हणून नावलौकिक मिळवला.

७. बालकौशल्य विकास हा नवोपक्रम मुलांचा सर्वांगीण विकास व कौशल्य विकास करण्यासाठी खूप उपयुक्त झाला असे मला वाटते.

८. बालकांचा कौशल्यविकास करत असतानाच त्यांचे मूळाक्षर लेखन, वाचन, शब्दलेखन-वाचन, अंकलेखन-वाचन हा शालेय अभ्यासक्रम उत्तमरित्या पूर्ण केला त्यामुळे मुलांना मुळाक्षरे, शब्द, अंक, लिहाणे व वाचणे हे छान पद्धतीने येऊ लागले. त्यामुळे त्यांचा भाषा विकसही झाला व गणिताची पूर्वकल्पना आली.

९. शाळा ऑनलाइन असल्यामुळे पालकांनी आपल्या मुलाचे प्रत्येक कृतीचे फोटो सोशल मीडिया च्या माध्यमातून लोकांपर्यंत पोहचवत असल्यामुळे जुई वर्गाचे उपक्रम आपोआपच सर्व लोकांपर्यंत पोहचत होते. त्यामुळे शाळेचीही प्रसिद्धी झाली.

१०. नवीन शैक्षणिक धोरण २०२०-२१ या धोरणाचे ध्येय बालकांचा सर्वांगीण विकास व त्यांचा कौशल्यविकास हे आहे त्या धोरणासाठी बालकौशल्य नवोपक्रमाची मदत होईल असे मला वाटते.

## • कार्यवाहीचे टप्पे :-

१. ऑनलाइन शाळेसाठी मुख्याध्यापकांसोबत चर्चा करून वार्षिक नियोजन ठरवले.

२. ऑनलाइन पालकसभा घेऊन पालकांना या सर्व नियोजनाची माहिती दिली.

३. मुलांच्या कौशल्यविकससाठी घरच्या घरी घेता येणाऱ्या उपक्रमांची यादी केली व त्या संबंधी पालकांशी चर्चा केली.

४. जुई वर्गाचा ३९ मुलांचा whatsapp ग्रुप बनवला. त्या ग्रुपवर शालेय अभ्यास व उपक्रमाची माहिती पाठवली.

५. उपक्रमासाठी लागणाऱ्या साहित्याची यादी पालकांना पाठवली व उपक्रम घेण्यास सुरवात केली.

६. ऑनलाइन शाळेमुळे सुरवातीला मुले कमी प्रतिसाद देत होती पण मी त्यांना अभ्यास पाठवण्यासाठी उत्तेजन दिल्यामुळे बाकी सर्व मुले उपक्रम व अभ्यासाचे फोटो ग्रुप वर पाठवू लागली.

## • उपक्रमासाठी इतरांची मदत :-

१. हा नवोपक्रम घेण्यासाठी सर्वात मोठी संस्थेची मदत झाली. संस्थेने कोरोनाच्या सुरवातीलाच आम्हाला ऑनलाइन तंत्रस्नेही प्रशिक्षण दिले. संस्थेच्या तंत्रस्नेही प्रशिक्षण देणाऱ्या सौ. अबोलीताई फणसळकर मॅडम यांची खूप मदत झाली.

२. ऑनलाइन शाळेचे नियोजन ठरवताना शिशुवाटिकेच्या मुख्याध्यापिका सौ. माटे बाई व सहकारी शिक्षिका यांची मदत झाली.

३. 'बालकौशल्य विकास' हा नवोपक्रम ज्या बालकांसाठी केला त्या बालकांची व त्यांच्या पालकांची मोलाची मदत झाली.

४. ऑनलाइन शाळेत वर्षभर घेतलेला अभ्यास, उपक्रम व इतर गोष्टी की ज्या मुलांचा स्वावलंबन, चांगल्या सवयी, छोट्या छोट्या कामाची सवय इ. मुलांचे गुण विकसित झाले हे सारे पाहून माझ्या वर्गाचे पालक व शाळेचे पर्यवेक्षक श्री. विजय कुलकर्णी सरांनी मला प्रेरित केले की हा तुमचा उपक्रम नवोपक्रम स्पर्धेसाठी पाठवू शकतो व त्यांनी या स्पर्धेसाठी उत्तम मार्गदर्शन केले. म्हणून हा नवोपक्रम म्हणून मला स्पर्धेसाठी पाठवता आला.

५. ऑनलाइन शाळेचा हा पहिलाच अनुभव असल्यामुळे ऑनलाइन शाळेसाठी माझ्या मुलीकडून मला बऱ्याच गोष्टींची मदत झाली.

६. ऑनलाइन शाळेत उपक्रम घेत असताना शाळेचे कार्यालयीन काम पाहणारे श्री महेंद्र जोशी सर व श्री सागर जोशी सर यांचीही खूप मदत झाली.

७. जनकल्याण प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री. शिरीष गोडबोले. उपाध्यक्ष श्री. तुकाराम चव्हाण, सचिव श्री अनिल कुलकर्णी, संचालिका सौ. स्वाती भागवत, संचालिका सौ. ज्योती कुलकर्णी, प्रकल्प प्रमुख श्री रमेश फणसळकर, मार्गदर्शिका सौ. रेखा फणसळकर यांनी या उपक्रमासाठी प्रोत्साहन दिले.

## • नवोपक्रमासाठी सादर करावयाचे पुरावे :-

❖ ऑनलाइन शाळेत शिकवलेले कौशल्यपूर्ण उपक्रम करताना मुले-















# ❖ ऑनलाइन शाळेत घेतलेल्या उपक्रमाबद्दल पालकांचे अभिप्राय-




नमस्कार मी श्री. आशीष विश्वनाथ जोशी माझा मुलगा कु. अनीष आशीष जोशी हा सरस्वती शिशुवाटीका कराड इथे मोठ्या गटात शिकत आहे. त्याच्या वर्ग शिक्षिका सौ. ग्रामोपाध्ये बाई यांनी वर्षभर अतिशय सुंदर आणि सोप्या पद्धतीने मुलांना ऑनलाईन शिकवले खरं तर ऑनलाईन पद्धत ही सर्वांनाच खूप नविन होती पण आमच्या बाईंनी ती आत्मसात करून आम्हाला सर्वांना आणि मुलांनाही शिकवली बाईंनी अभ्यास, उपक्रम, पाठांतर स्पर्धा, रांगोळी रंग भरणे स्पर्धा, वार्षिक स्नेहसंमेलन आणि बरेच काही खूप छान पद्धतीने घेतले सौ. ग्रामोपाध्ये बाई तुमचे खूप खूप धन्यवाद तुम्ही घेतलेल्या प्रत्येक उपक्रमातून आमची मुले काही न काही शिकली तसेच काही बदल ही झाले मुलात तुमचे नियोजन हे नेहमीच खूप छान असते कोणतीही गोष्ट करताना ती तुम्ही फार जिव्हाळ्याने आणि आत्मीयतेने करता खूप कष्ट घेता त्यामुळे कोणत्याही प्रकारचा गोंधळ होत नाही. पालकांना आणि मुलांना पण ते व्यवस्थीत कळते विशेष म्हणजे तुम्ही खूप उपक्रम घेतलेत पण त्यातील काही उपक्रम हे विशेष नमुद करण्यासारखे आहेत ते म्हणजे

(१) वस्तू जागेवर ठेवणे अनीषला ही सवय खूप चांगली लागली आहे. तो प्रत्येक वस्तू काम झाल्यावर जागेवर ठेवतो.

(२) उकडलेले बटाटे सोलणे. तो खूप छान प्रकारे उकडलेल्या बटाट्याचे साल काढतो त्याने चक्क घाटावरील बटाटे वड्याच्या गाड्यावर बटाटे सोलून त्या काकांना मदत केली होती.

(३) विविध प्रकारची सरबते तयार करणे आधी त्याला साखर, मीठ, लिंबू व पाणी किती घ्यावे ते कळत नव्हते पण आता तो छान सरबत करतो

(४) कपडे हॅंगरला लावून ठेवणे तुम्ही शाळेत शिकवल्यापासून तो शर्ट व टिशर्ट काढला की



हॅंगरला लावून कपाटात ठेवतो.

(५) काकडी, बीट, गाजर, मुळा यांच्या कोशिंबीरी तुम्ही सांगीतल्या प्रमाणे तो घरात अगदी किसण्या पासून ते कोशिंबिर तयार करण्या पर्यंत सर्व काही करतो थोडा मीठ, साखरेचा अंदाज आजून येत नाही पण चव पाहिल्यावर त्याला काय कमी आहे ते कळते.

(६) प्रार्थना, भजन, श्लोक, मनाचे श्लोक हे तुम्ही रोज म्हणून घेत होतात त्यामुळे त्यांचे पाठांतर अतिशय सुंदर आणि स्पष्ट झाले.


(७) १ ते १० अंकाच्या वस्तू मोजायला शिकवल्याने त्याला वस्तू किती आहेत ते कळू लागले उदाहरणार्थ त्याला सात आंबे आण असे सांगीतल्यावर तो बरोबर सात आंबे घेवून येतो.

(८) नाणी आणि नोटांची ओळख झाल्यामुळे त्याला पैसे समजू लागले आहेत.

(९) सगळ्यात महत्वाचे म्हणजे काही उपक्रम हे असे होते ज्यासाठी बाहेरून साहित्य आणणे गरजेचे होते पण कोरोना मुळे सर्व बंद होते. पण बाई थांबल्या नाहीत त्यांनी घरातील वस्तू वापरून उपक्रम घेतले जसे की घरातील जून्या लग्न पत्रीकांन पासून भेट कार्ड बनवणे, रद्दी पेपर पासून फोटो फ्रेम बनवायला शिकवली. शेंगांची, पिस्त्याची फोलपटे, सिताफळाच्या बिया यापासून वेगवेगळी फुले व नक्षी करायला शिकवले.

(१०) वार्षिक स्नेहसंमेलन, शिवजयंती, रामदास नवमी असे कार्यक्रम ऑनलाईन पद्धतीने त्यांनी साजरे केले तसेच मुलांची सर्व तयारी करून घेतली व वेळोवेळी आम्हाला खूप छान सहकार्य केले त्यामुळे ऑनलाईन असून पण कार्यक्रम खूप छान झाला याचे सर्व श्रेय तुमचेच आहे.

(११) अ ते ज्ञ मुळाक्षरे, १ ते २० अंक वाचन, चढता उतरता क्रम सम विषम संख्या, वस्तू मोजणे या अभ्यासाच्या गोष्टी छोट्या छोट्या उपक्रमातून शिकवल्या उदाहरण सांगायचे तर अंक वाचन




घेताना बाईंनी अंकाच्या चिठ्या केल्या आणि वाडग्या मध्ये ठेवून एक चिठ्ठी काढली आणि तेवढ्या घरातील वस्तू दाखवल्या आणि हा खेळ मुलांना घरी खेळायला सांगीतला त्यामुळे मुलांचे अंक अगदी पक्के झाले, वस्तू मोजायला येवू लागल्या असे अभ्यासाचे छान उपक्रम बाईंनी करून घेतले.

(१२) भौमितीक आकार शिकवले आणि त्यापासून विदूषकाची टोपी, आगगाडी सुद्धा शिकवली, कोलाज काम, मातीची खेळणी बनवायला व चित्र काढायला शिकवले.

वरील सर्व गोष्टींमुळे मुलांशी जे तुमचे जिव्हाळ्याचे नाते तयार झाले आहे, त्यामुळे मुले सर्वांशी स्पष्ट न घाबरता बोलतात, स्वतःचे मत स्पष्ट मांडतात खर तर असा प्रत्येक उपक्रमाचा मुलांना खूप फायदा झालो आहे तसेच मुलांच्या मध्ये काही चांगले बदल देखील झाले आहेत.

सगळे लिहायचे ठरवले तर पाने पुरायची नाहित म्हणून थोडक्यात लिहला आहे. मी पालक प्रतिनीधी म्हणून सर्व पालकांच्या वतीने सौ. ग्रामोपाध्ये बाई तुमचे खरच मनापासून आभार मानतो आणि खूप खूप धन्यवाद देतो आमचे आणि आमच्या मुलांचे नशीबच म्हणायचे की तुमच्या सारख्या बाई मुलांना योग्य वयात लाभल्या धन्यवाद बाई.



चि. आदित्य प्रविण कारिद.
सरस्वती शुशुवाटीका, कराड.
जुई मोठा गट.

आदित्य हा जुई मोठा गट या वर्गात शिकत होता त्याच्या शिक्षिका सौ. ग्रामोपाध्ये बाई.

बाईनी अभ्यासाव्यतिरिक्त खूप काही मुलांना शिकवल. उदा. रांगोळी काढणे, कपड्यांच्या घड्या, सरबत, कोशिंबीर इ. अशा खूप साध्या दैनंदिन जीवनातल्या गोष्टी बाईंनी शिकवल्या. त्यामुळे आदित्य आता स्वावलंबी बनला आहे. जेवढ्या जमतात तेवढ्या गोष्टी तो स्वतः करु लागला आहे. स्वतःच्या वस्तू जागेवरती ठेवणे, साफसफाई करणे, घरकामात मदत करणे, स्वतःची कामे स्वतः करणे हे बाईंच्यामुळे तो शिकला.

बाईंनी ज्यादिवशी त्याला सरबत करायला शिकवला त्या दिवशीच तो मला म्हणाला 'आई आता मला सरबत करता येतो आणि तो मिच मीच बनवणार' तो स्वतः आता कोकम सरबत बनवतो व दुपारच्या वेळी आजी - आजोबांना देतो. गणेशउत्सव मध्ये तो रोज दुर्वा निवडत होता. दसऱ्यामध्ये बाईंनी हार शिकवला तर त्याने दसऱ्यादिवशी त्याच्या सायकलचा व बाबांच्या गाडीला हार बनवला.

स्नेहसंमेलन व शिवजयंती याचे व्हिडिओ स्टेटसला ठेवल्यानंतर आमच्या भरपूर नातेवाईकांनी व मैत्रिणींनी कौतुक केले व 'कोणत्या शाळेत आहे तो' असेही विचारले.

बाई जे काही सांगतात ते तो सर्व ऐकतो. मग ते पाठांतर असो, स्पर्धा असो, अभ्यास असो. आदित्यला बाईंमुळे पाठांतराची सवय लागली.

# नवोपक्रमाची कार्यपद्धती

## • पूर्वस्थितीची निरीक्षणे व त्यांच्या नोंदी :-

१. बाल्यावस्था ही मानवी विकासाच्या अवस्थामधील अत्यंत महत्वाची अवस्था आहे. या अवस्थेमध्ये बालकांची सर्वांगीण वाढ झपाट्याने होत असते. या वयात त्यांच्या जिज्ञासू वृत्तीचा व त्यांच्या शारीरिक अवयवांचा विकास उत्तमरित्या होत असतो. मात्र त्यांच्यामध्ये आवश्यक ती जीवन कौशल्य लहानपणापासून विकसित होण्यासाठी हा उपक्रम करण्यात आला या निमित्ताने संधी त्यांना दिली.

२. Lockdown काळात पालक आपल्या पाल्याची अधिक काळजी घेताना दिसले. त्यामुळे विद्यार्थी स्थूलता वाढलेली दिसली.

३. मुले घरात होती त्यामुळे लाडावलेली होती. काम करताना कौशल्य अभाव जाणवत होता.

४. छोटी छोटी कामे करताना सहजता नव्हती. काम करताना क्रमाने क्रिया होत नव्हती.

५. Lockdown मध्ये जाणवले की मुलांना क्रिया दिल्यानंतर आपले मूल चुकू नये म्हणून पालक हस्तक्षेप जाणवत होता.

६. मुलांना गुंतवून ठेवणे आवश्यक होते. मुलांच्या वर्तनामध्ये चीड-चिडेपणा वाढला होता.

७. शालेय अभ्यासक्रमासोबत शिकण्यात रस कमी होता. ऑनलाइन अध्यापनामध्ये तोचतोचपणा मुलांना वाटत होता.

८. मुले कमी बोलत होती. संवाद करायला घाबरत होती. शब्दसंपत्ती कमी होती. गोड पण बोल मात्र बोबडे असायचे.

९. पालक तक्रार करायचे की मुले घरात ऐकत नाहीत. टीव्ही. मोबईल चे व्यसन लागल्यासारखे झाले होते.

१०. पालकांना शिक्षण म्हणजे फक्त वाचन, लेखन एवढेच वाटायचे ते त्यांचा फक्त याच गोष्टींकडे जास्त कल होता.

११. घरातील छोटी छोटी कामे करायला मुलांना कमीपणाचे वाटत होते.

१२. पालकांना आपल्या बालकांच्या कृती, कौशल्यावर कमी विश्वास होता. प्रत्येक गोष्टीत लहान आहेस, तू हे करू नकोस अश्याच सूचना नेहमी पालकांच्या असायच्या.

१३. मुलांबरोबर पालकांचा संवाद कमीप्रमाणात व्हायचा, त्यामुळे मुले कमी बोलायची.

१४. मुलांना हाताला, पायाला, मेंदूला, कमी प्रमाणात चालना मिळत होती.

१५. स्वावलंबन, स्वच्छता, कामाची सवय, हे गुण लहानवयातच रुजले तर मोठेपणी त्यांना त्याचा फायदा होतो.

१६. बालकांच्यात उपजतच खूप कौशल्ये असतात पण त्यांना योग्य वेळी ओळखता येणे हे पालकांच्यात रुजवणे हा हेतु या नवोपक्रमाचा होता.

## • कार्यवाही दरम्यान निरीक्षणे व माहिती संकलन :-

१. जुई वर्गातील सर्व मुले प्रत्येक उपक्रमात भाग घेऊ लागली त्यामुळे त्यांची चौफेर प्रगती झाली.
२. मुलांचे प्रार्थना, श्लोक, अथर्वशीर्ष, मनाचे श्लोक इ. छान पाठांतर झाले. त्यामुळे काही मुलांचा बोबडेपणा, तोतरेपणा कमी झाला मुले लयबद्ध म्हणायला शिकली मुलांचे बोलण्याचे कौशल्य वाढले, धीटपणा वाढला.
३. मुले बोलती झाली. एखादी गोष्ट नाही कळली तर लगेच तिथेच विचारात होती व समजून घेत होती त्यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढला.
४. मी घेतलेल्या 'बालकौशल्य विकास' या नवोपक्रमामुळे जुई वर्गातील मुलांचा शारीरिक, मानसिक, भावनिक, बौद्धिक विकास छान पद्धतीने झाला तसेच भाषा विकास, गणित विज्ञान यांचे पूर्वज्ञान विकसित झाले.
५. मुले शिकू लागली, आवड निर्माण झाली, उपक्रमातून अभ्यास सुरू झाला.
६. मुले गुंतून राहू लागली आणि त्यांचे घरातील काम बघून असेही मुले घरातील वातावरणात शिकू शकतात याची जाणीव झाली.
७. मुले टीव्ही,मोबाइल पासून आपसूकच दुरावली.
८. साधने हाताळता येवू लागली. साधनांचा वापर कळाला.
९. मुलांच्या घरातील लुडबूडीकडे सकारात्मक दृष्टीने पाहिले. तशी मदत आता पालकच करू लागले.
१०. मुलांनी हळूहळू प्रत्येक उपक्रम करताना स्व: कौशल्य वापरली.
११. जीवन कौशल्य विकास झाला.
१२. घरातील कामे मुले व मुलींना जमलीच पाहिजेल असे ठाम सांगितल्याने पालकांना हे पटू लागले. मुलांकडून ही कामे करताना मुलांचे बाबा ही करू लागले.

## • उपक्रम पूर्ण झाल्यावर निरीक्षण :-

१. जुई वर्गासाठी जे जे उपक्रम, पाठांतर, अभ्यास घेतले त्यावर शेवटी परीक्षा घेतली पण मुलांना परीक्षा असे वाटलेच नाही. मुले छान उत्तरे देत होती. माझा नंबर कधी आहे असे मुले विचारत होती त्यांना परीक्षेबद्दल मोठी उत्सुकता होती.
२. स्पर्धा मुलांमध्ये स्वत:बद्दल विश्वास निर्माण करते म्हणून काही उपक्रमांचे रूपांतर स्पर्धेत केले ज्यामुळे मुले हिरीरीने भाग घेताना व गुणवत्ता पूर्ण उपक्रम केले.
३. प्रत्येक मुलांमध्ये वेगवेगळे कलागुण असतात त्यामध्ये तो यश मिळवू शकतो हे पालकांना समजले.
४. जुई वर्गासाठी काही हस्तव्यवसायचे, मातीकामाचे उपक्रम घेतले त्यामध्ये पालकांचीही कल्पकता दिसून आली आणि पालकांच्या नवनिर्मितीला उत्तेजन मिळाले.

५. जुई वर्गाची मुलांची ऑनलाइन तोंडी परीक्षा घेतली आणि ऑनलाइन लेखी परीक्षा पण घेतली. तीही मुलांनी खूप छान पद्धतीने दिली.
६. पालकांनीही लहान मुले म्हणून कसलेही दुर्लक्ष केले नाही प्रत्येक उपक्रमात जिथे रेंज असेल तिथे पालक मुलाला घेऊन बसत होते.
७. मुलेही सर्व अभ्यास, उपक्रम, पाठांतर करत होती, अभ्यास टाळत नव्हती. जरी मुले एखाद्या वेळेस गैरहजर असतील तर इतर पालकांकडून घेऊन तो अभ्यास पूर्ण करत होती.
८. मुले गुंतून राहिली शालाबाह्य झाली नाहीत.
९. मुलांना एकमेकांचा अभ्यास ग्रुपवर पाहून प्रोत्साहन मिळत होते.

## • कार्यवाहित आलेल्या अडचणी :-

१. कोरोनाचे संकट आल्यामुळे शाळा कशी घ्यायची हा प्रश्न होता. हे संकट किती दिवस राहील हे माहिती नव्हते.
२. ऑनलाइन शाळा किती यशस्वी होईल व पालकांचा कसं प्रतिसाद मिळेल हे माहिती नव्हते.
३. सुरवातीला बऱ्याच पालकांना मोबाइलची माहिती नव्हती. प्रत्येक पालकांना ऑनलाइन शाळा कशी घेणार हे समजून सांगावं लागल. तरीही काही पालकांना ते लगेच समजत नव्हते.
४. ऑनलाइन शिकवताना मुले समोर नव्हती त्यामुळे एकट्यानेच बोलायचे. कमी वेळेत आपल्या अभ्यासाचे नियोजन बसवायचे हे सर्व नवीन होतं.
५. सुरवातीला कोरोनाच्या भीतीने लोक त्यांच्या गावी गेले होते तिथे रेंज चा अडथळा येत होता.
६. आम्ही शिकवलेले काही वेळा ऐकू जात नव्हत काही वेळा दिसत नव्हत अश्यावेळी त्यांना शिकवलेल्या घटकचा व्हिडीओ करून पाठवावा लागत होता.
७. काही पालकांच्या घरी कोरोना रुग्ण आढळल्यामुळे त्यांची मानसिकता ठीक नव्हती.
८. सर्व बंद असल्यामुळे बाहेरील शालेयसाहित्य उपलब्ध नव्हते.
९. शिकवताना आत्मविश्वास खूप होता परंतु मुलांना ऑनलाइन शिकवलेलं दिसेल का? कळेल का? या बद्दल साशंकता होती.
१०. मुलांना शाळेत शिकवताना आमच्याशी बोलायचं असायच, प्रश्नांची उत्तरे द्यायची असायची परंतु सर्वांनी माइक चालू केल्यामुळे गोंगाट होत होता त्यामुळे त्यांना माइक बंद करायला सांगाव लागायच.

# • माहितीचे विश्लेषण- आलेख, तक्ते :-

## तक्ता १

( १ ते २५ उपक्रम )

| सरस्वती शिशुवाटिका, कराड | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| जुई मोठा गट २०२०-२१ | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| अ. नं | विद्यार्थी नावे | उपक्रम | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | माझी निरीक्षणे |
| | | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ | २३ | २४ | २५ | |
| १ | शौर्य | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | | | | | | O | | | O | O | कौशल्य विकास, धिटपणा |
| २ | सिद्धांत | | O | | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | भाषा विकास, धिटपणा |
| ३ | शंतनू | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | पाठांतर, धिटपणा |
| ४ | देवराज | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | भाषा विकास, कौशल्य विकास |
| ५ | क्रितिका | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | धिटपणा, कौशल्य विकास |
| ६ | साईश | O | O | | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | धिटपणा, बोबडेपणा कमी |
| ७ | अनिष | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | सर्वांगिण विकास |
| ८ | आनंदी | O | O | O | O | O | O | O | | | | | | | | | | | | | | | | | | | धिटपणा, कौशल्य विकास |
| ९ | विराट | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | भाषा विकास |
| १० | सई | O | O | O | O | | O | O | O | O | O | | | | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | धिटपणा |
| ११ | आदित्य | O | O | O | O | O | O | O | O | O | O | | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | सर्वांगिण विकास |
| १२ | पौर्णिमा | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | धिटपणा, कौशल्य विकास |
| १३ | सुबोध | O | O | | O | O | | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | भाषा विकास |
| १४ | श्रीरंग | | | | O | O | | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | धिटपणा, भाषा विकास |
| १५ | उत्कर्ष | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | सर्वांगिण विकास |
| १६ | अभयसिंह | O | O | | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | धिटपणा, बोलण्याचे कौशल्य |
| १७ | आराध्या | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | भोचरे पणा कमी, धिटपणा |
| १८ | अंशुमन | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | पाठांतर, बोलण्याचे कौशल्य |
| १९ | अभिनव | | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | कौशल्य विकास, धिटपणा |
| २० | पृथ्वीराज | O | O | O | | O | | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | भाषा विकास, धिटपणा |
| २१ | श्रेयांस | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | भाषा विकास |
| २२ | मनस्वी | O | O | | | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | |
| २३ | अर्णव | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | सर्वांगिण विकास, कौशल्य वाढ |
| २४ | अविर | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | सर्वांगिण " " |
| २५ | हर्षित | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | भाषा विकास, धिटपणा |
| २६ | मुक्ता | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | भाषा विकास, धिटपणा |
| २७ | अनुश्री | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | भाषा विकास, धिटपणा |
| २८ | श्रेयस | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | बोलण्याचे कौशल्य |
| २९ | स्वरा | | | | | | | | | | | | | | | | O | O | O | O | O | O | O | O | O | O | भाषा विकास |
| ३० | समर्थ | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | सर्वांगिण विकास, धिटपणा |
| ३१ | तेजस्विनी | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | सर्वांगिण विकास, धिटपणा |
| ३२ | स्वराज | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | भाषा विकास, धिटपणा |
| ३३ | स्मित | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | सर्वांगिण विकास |
| ३४ | रज्ञा | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | सर्वांगिण विकास |
| ३५ | अन्वीता | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | भाषा विकास |
| ३६ | जय | O | O | O | O | O | | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | धिटपणा, भाषा विकास |
| ३७ | सोहम | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | कौशल्य विकास |
| ३८ | शौर्या | O | O | O | | O | | O | O | O | O | O | O | O | | | O | | | | | | | O | | O | भाषा विकास |
| ३९ | अन्वीत | O | O | | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | सर्वांगिण विकास |

सूचि – ⊡ उपस्थित विद्यार्थी
☐ गैरहजर विद्यार्थी

एकूण विद्यार्थी - ३९

एकूण उपक्रम - ५१

सरासरी उपस्थिती - ९८%

सूची- क्रमांक ८, २१, २९ चे विद्यार्थी ऑनलाइन शाळेत आर्थिक परिस्थितीच्या कारणास्तव गैरहजर होते. परंतु ते फोनवरून अभ्यास विचारून त्यांचा त्या तासाचा अभ्यास पूर्ण करून घेत होते व तसा फोटो व व्हिडीओ whatssapp ग्रुप वर पाठवत होते.

# तक्ता २

( २६ ते ५१ उपक्रम )

सरस्वती शिशुवाटिका, कराड

जुई मोठा गट २०२०-२१

| अ. नं | विद्यार्थी नावे | उपक्रम | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | माझी निरीक्षणे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | २६ | २७ | २८ | २९ | ३० | ३१ | ३२ | ३३ | ३४ | ३५ | ३६ | ३७ | ३८ | ३९ | ४० | ४१ | ४२ | ४३ | ४४ | ४५ | ४६ | ४७ | ४८ | ४९ | ५० | ५१ | |
| १ | शौर्य | O | O | O | O | O | O | O | | O | | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | कौशल्य विकास |
| २ | सिद्धांत | O | O | O | | O | O | O | O | | O | O | O | O | O | O | O | | O | O | O | O | O | O | O | O | O | भाषा विकास, बौध्दिक विकास |
| ३ | शंतनू | O | O | O | | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | | O | O | O | O | कौशल्य विकास |
| ४ | देवराज | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | कौशल्य विकास |
| ५ | क्रितिका | O | O | O | | O | O | | O | O | O | O | O | O | O | O | | O | O | O | O | O | O | O | O | O | O | धिटपणा, कौशल्य वाढ |
| ६ | साईश | O | O | O | O | O | O | O | O | O | O | | | | | O | | O | O | O | | O | | | | O | O | कौशल्य वाढ, भाषा विकास |
| ७ | अनिष | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | कौशल्य वाढ, बौध्दिक विकास |
| ८ | आनंदी | O | | O | O | O | | | | O | | | | | O | | | O | O | | | | O | | | | | मानसिक विकास |
| ९ | विराट | O | O | O | O | O | O | | O | O | O | | O | O | O | O | | | O | O | O | O | O | | | | O | भाषा विकास |
| १० | सई | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | धिटपणा, कौशल्य विकास |
| ११ | आदित्य | O | O | O | O | O | O | O | O | O | O | | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | कौशल्य वाढ, बौध्दिक विकास |
| १२ | पौर्णिमा | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | | O | O | O | O | O | O | O | स्वावलंबन, कौशल्य वाढ |
| १३ | सुबोध | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | | O | O | O | O | O | O | O | | | धिटपणा |
| १४ | श्रीरंग | O | O | O | O | O | O | O | O | O | O | | | O | | | | | O | O | O | O | O | O | O | O | O | चोखडपणा कमी |
| १५ | उत्कर्ष | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | कामात मदत, कौशल्य वाढ |
| १६ | अभयसिंह | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | | O | O | O | O | O | O | O | O | | O | | O | भाषा विकास |
| १७ | आराध्या | O | O | O | O | O | O | | O | O | O | O | | O | O | | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | बौध्दिक विकास |
| १८ | अंशुमन | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | धिटपणा, बौद्धिक विकास |
| १९ | अभिनव | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | भाषा विकास, स्नायुंचे कौशल्य |
| २० | पृथ्वीराज | O | O | O | O | O | O | O | O | O | | O | O | | O | | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | कामात मदत |
| २१ | श्रेयांस | | O | | O | O | | | | O | | | | | O | | | | O | | O | | O | O | O | | | धिटपणा |
| २२ | मनस्वी | O | O | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| २३ | अर्णव | O | O | O | O | O | O | O | | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | बौद्धिक विकास, चित्र ज्ञान |
| २४ | अविर | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | कामात मदत, उत्साही |
| २५ | हर्षित | O | O | O | O | O | O | O | O | O | | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | बोलण्याचे कौशल्य |
| २६ | मुक्ता | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | | O | O | O | O | O | O | O | O | O | O | | O | O | बौद्धिक विकास |
| २७ | अनुश्री | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | कौशल्य विकास |
| २८ | श्रेयस | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | | O | O | बौद्धिक विकास |
| २९ | स्वरा | O | O | O | O | O | O | O | O | | | | | O | | | | O | | | O | | O | O | | | | |
| ३० | समर्थ | O | O | O | O | O | O | O | | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | बोलण्याचे कौशल्य वाढ |
| ३१ | तेजस्विनी | O | O | O | O | O | O | O | | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | बौद्धिक विकास |
| ३२ | स्वराज | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | अभिनय कौशल्य वाढ |
| ३३ | स्मित | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | | | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | पाठांतर, श्रवण कौशल्य |
| ३४ | रज्ञा | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | | O | O | O | O | O | कौशल्य विकास |
| ३५ | अन्वीता | O | O | O | | O | | O | O | O | O | O | O | O | | O | O | | O | | O | | O | O | O | O | O | कौशल्य विकास |
| ३६ | जय | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | बौद्धिक विकास |
| ३७ | सोहम | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | | O | O | O | O | O | O | | | O | O | O | O | O | भाषा विकास |
| ३८ | शौर्या | O | O | O | | | O | O | O | | | | | | | | | | O | O | | | | | | | | भाषा विकास |
| ३९ | अन्वीत | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | O | स्वावलंबन, कौशल्य वाढ |

सूची - [O] - उपस्थित विद्यार्थी
[ ] - गैरहजर विद्यार्थी

वर्गातील एकूण विद्यार्थी ३९ सहभागी विद्यार्थी ३९

विद्यार्थ्यांनी केलेले उपक्रम ५१

विद्यार्थी ३९ * उपक्रम ५१ = १९८९

म्हणजेच या उपक्रमाच्या माध्यमातून एकूण १९८९ उपक्रम प्रत्येक वेगवेगळ्या पद्धतीने विद्यार्थ्यांनी केले व मला पाहायला मिळाले.

# नवोपक्रमाची यशस्विता

## • नवोपक्रमाची यशस्विता :-

१. पाठ्यपुस्तकासोबत प्रत्यक्ष जीवनकौशल्यांची अनुभूती दिली.

२. मुलगा-मुलगी समान हा संस्कार दिला. या समानतेचा संस्कार पालकांना खूप आवडला. पालकांकडून त्या बद्दल सकारात्मक प्रतिक्रिया आल्या.

३. विद्यार्थ्यांची कौशल्ये वाढली. निरीक्षण क्षमता वाढली.

४. घरातील कामे करण्यामध्ये आनंद मिळाला उदा. केर काढणे, साफसफाई करणे, कपड्यांच्या घड्या घालणे भाजी निवडणे, सरबत करणे, गाजर खिसणे, दूर्वा निवडणे, हार करणे, रंगोळी काढणे, बाटलीत पाणी भरणे, झाडांना पाणी घालणे, आपल्या वस्तु व्यवस्थित ठेवणे इ. छोट्या छोट्या कामातून मुलांना आनंद मिळाला तो आनंद या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मिळाला.

५. एकूण ५१ उपक्रमाच्या माध्यमातून कौशल्यआधारित शिक्षण देण्यात आले. यामध्ये ३९ विद्यार्थी सहभागी होते.

६. सरासरी उपस्थिती ९८% होती त्यामुळे उपक्रम सर्वांपर्यंत पोहचला.

७. मुले घरातील कामे करताना कौशल्यपूर्ण कामे करू लागली.

८. त्यांना काम कसे करायच हे कळू लागल.

९. मुलांनी फुलांचा हार करून स्वतःच्या सायकलला घातला.

१०. घरातील व्यक्ति तसेच मित्र-मैत्रिणींच्या वाढदिवसादिवाशी स्वतः भेटकार्ड तयार करून दिले.

११. मुलांनी भरपूर उपक्रम केल्यामुळे मुलांचा आत्मविश्वास जागृत झाला नवनवीन गोष्टी केल्याचा आनंद त्यांना मिळाला.

### फलनिष्पत्ती -

अ. कोरोना काळातही मुलांची उपस्थिती चांगली राहिली त्याचा फायदा असा झाला की सर्व मुले सर्व उपक्रमात सहभागी झाली. त्यामुळे त्यांची बौद्धिक, शारीरिक, मानसिक, भावनिक प्रगती झाली.

आ. मुलांचा भरपूर सराव घेतल्यामुळे मुले सर्व गोष्टीत तरबेज झाली. सांगितलेली प्रत्येक गोष्ट मुले घरी लगेच करून दाखवत होते. दिवाळीत मुलांनी स्वतः किल्ला केला, आवडत्या वस्तूंचा संग्रह केला व त्याची माहिती ऑनलाइन शाळेत प्रत्यक्ष दाखवून सांगितली.

इ. मुले चांगल्या गोष्टीमध्ये गुंतून राहिली पालकांना बऱ्याच नवीन गोष्टी शिकायला मिळाल्या.

ई. Lockdown मुळे सर्व बंद होते पण आमची बालवाडी पूर्ण वर्षभर ऑनलाइन चालू होती. शालेय अभ्यासक्रमाबरोबर सण समारंभ, स्नेहसंमेलन, शिवजयंती, दासनावमी इ. सर्व उपक्रम ऑनलाइन शाळेत उत्तमरित्या साजरे झाले. या सर्व उपक्रमात मुलांचा सहभाग उत्तमरित्या होता. त्यामुळे शाळेची आपोआप प्रसिद्धी झाली.

उ. मुले गुंतून राहिली, पालकांचा फायदा झाला, मुलांना चांगले संस्कार मिळाले, कामाची सवय लागली, स्वच्छता, स्वावलंबन, आत्मविश्वास इ गुणांची वाढ झाली.

ऊ. आईच्या श्रमाची जाणीव झाली. मुले सर्व छोटी छोटी कामे करू लागली उदा. दूर्वा निवडणे, हार करणे, बटाटे सोलणे इ. विविध कौशल्यांचा विकास झाला.

ऋ. Lockdown काळात अभ्यासाबरोबर आपण मुलांना वेगळ कौशल्यपूर्ण काय शिकवू शकतो याचा मीही अभ्यास केला तेव्हा माझीही शैक्षणिक प्रगती झाली.

ऌ. पाठांतरामध्ये मुले एवढी तरबेज झाली की पहिलीत गेल्यावर सर्व स्पर्धांमध्ये मुले यश संपादन करू लागली.

ऍ. 'घरीच रहा व सुरक्षित रहा' या नियमाच पालन करून शाळा घेतली त्यामुळे कोणालाही बाहेर कुठे यावं लागल नाही.

# समारोप

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये मी हा 'बालकौशल्य विकास' या नवोपक्रमच्या माध्यमातून मुलांवरती विविध कौशल्यविकास करता यावा, त्यांची सर्वांगीण वाढ व्हावी आणि मुले lockdown च्या काळात गुंतून रहावीत त्यासाठी छोटासा हा प्रयत्न केला. त्यासाठी मला शाळेने, पालकांनी, विद्यार्थ्यांनी मोलाच सहकार्य केल त्यांच्याशिवाय हे होऊ शकल नसत आणि एक शिक्षक म्हणून अश्या विविध पद्धतीने मुलांना शिकवायला मला खरंच आवडत. या नवोपक्रमच्या माध्यमातून lockdown च्या काळातही मुलांना शाळेशी जोडू शकले. मुलांना गुंतवून ठेवू शकले. शालेय प्रवाहातून मुले बाहेर जाऊ नये याची पुरेपूर काळजी घेतली आणि या उपक्रमाच्या माध्यमातून १००% साध्य झाल. याचा मला हा उपक्रम करताना मनस्वी आनंद होत आहे आणि या स्पर्धेमध्ये पाठवताना अत्यंत आनंद होत आहे अश्याप्रकारे आपण उपक्रमाच्या माध्यमातून शिकवल तर त्यांचा सर्वांगीण विकास होण्यास मदत होईल. नवोपक्रम स्पर्धेमधून ही कार्यपद्धती सर्वांपर्यंत पोहोचावी हा माझा शुद्ध हेतु आहे.

# संदर्भसूची व परिशिष्ठे


- शिशुवाटिका तत्व आणि व्यवहार- लेखक - इंदुमती काटदरे.
- शिक्षणप्रवाहाच्या उगमापाशी- लेखक - सुचिता पडळकर.
- बालशिक्षण विचार आणि आचार - संपादक - भालबा विभूते.


**धन्यवाद !**